# RJBiotech

## गुणवत्ता देते... अधिक पैसा...

### संशोधित संकरित भेंडी बियाणे

# हिना

**(RJO-01)**



- फळे-आकर्षक हिरवी, चमकदार आणि चवदार.
- फळाची लांबी १२-१४ से.मी.
- पहिली तोडणी ४५-५० दिवसात.
- भरपूर उत्पादन क्षमता.
- यलो व्हेन मोझॅक व्हायरस प्रतिकारक.

R J Group
Aiming new heights

**आर जे बायोटेक प्रा.लि.**
औरंगाबाद

# RJBiotech

## भेंडीच्या उत्कृष्ट उत्पादनासाठी लागवडीची पध्दत

**जमीन :** भेंडी हे पिक सर्व प्रकारच्या जमिनीत येते तरीपण सुपीक व चांगला पाण्यांचा निचरा होणाऱ्या जमिनीत हे पिक चागले वाढते आणि उत्पन्न ही भरपूर येते.प्रथम जमीन चागली नांगरून भुसभुसीत करावी व शेणखत टाकूण ७५सेमी अंतरावर सऱ्या पाडाव्यात. जमीनीचा पी.एच. ६.५ ते ७.५ असणे पिकाच्या अधिक उत्पन्नासाठी आवश्यक आहे.

**लागवडीचे अंतर व बियांचे प्रमाण :** बियाणे लागवडी पुर्वी एक तास उन्हात वाळऊन पेरणीसाठी वापरावे. एकरी १.५ किलो बियाणे वापरावे. दोन रोपातील अंतर २० से.मी. व ओळीतील अंतर ७५ से.मी असावे.

**हवामान :** भेंडी हे पिक महाराष्ट्रात तीनही हंगामात घेतायेते. पावसाळी हंगामात भेंडीची लागवड जून ते जुलै पर्यत करावी. रब्बी हंगामात सप्टेंबर ते ऑक्टोबर पर्यंत लागवड करावी. व उन्हाळी हंगामात १५ जानेवारी ते फेब्रुवारी पर्यत लागवड करावी.

**खते :** एकरी २० टन शेण खत वापरावे या व्यतिरिक्त ७५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश समान हप्त्यात लागवडीपासून २५, ४० व ६० दिवसाच्या अंतराने द्यावे. नत्राचा डोस तीन समान हप्त्यामध्ये द्यावा.

**पाणी व आंतरमशागत :** पाणी जमीनीच्या मगदूराप्रमाणे दर ४थ्या किवा ६ व्या दिवशी द्यावे. व लागवडीनंतर पूर्ण उगवण झाल्यावर जरूरीप्रमाणे खुरपणी किवा कोळपणी करावी.

**तोडणी :** पहिली तोडणी लागवडीपासून ४० ते ४५ दिवसांनी करण्यास हरकत नाही. तोडणी नंतर पाण्याचा ताण तसेच नत्राचे प्रमाण कमी पडणार नाही ह्याची काळजी घेणे आवश्यक आहे. भेंडीच्या उत्तम प्रतिसाठी व बाजारासाठी दर एक दिवसाआड तोडणी करावी.

**उत्पन्न :** भेंडीचे सरासरी उत्पादन एकरी ६-८ टनापर्यंत मिळते.

**पीक संरक्षण :**

**१) ठिपक्याची आळी :** या किडीसाठी लागवडीनतर १५ दिवसानी प्रोफीनोफॉस + सायपर २५ मि.लि. १० लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने ३-४ वेळा फवारावे. किवा निमराज ३०० पी.पी.एम. १० लिटर पाण्यात २० मी.लि. मिसळून १५ दिवसांच्या अंतराने फवारावे.

**२)यलो व्हेन मोझॅक :** भेंडीवर विषाणूजन्य हळद्या (यलो व्हेन मोझॅक) आणि भुरी या अत्यंत घातक रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. त्यामूळे भेंडीच्या लागवडी करिता संकरित भेंडी हिना या जातीची लागवड करावी. कारण हिना ह्या संकरित जातीवर हळद्या रोगाचा प्रादूर्भाव होत नाही. या रोगाचा प्रसार पांढरी माशी या किडीपासून होतो. किडीचे नियंत्रणासाठी मोनोक्रोटोफॉस १० मि.लि. १० लिटर पाण्यात मिसळून ८ ते १० दिवसांच्या अंतराने भेंडी फळे तोडल्यानंतर पिकावर फवारावे. किवा निमराज १०००० पी.पी.एम. १० लिटर पाण्यात १० मी.लि. मिसळून १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ वेळा फवारावे.

**३)भुरी :** या बुरशीजन्य रोगाची सुरूवात खालच्या पानांपासून होते. पानांवर पांढरे डाग दिसतात. ते पसरत जाऊन पुर्ण पानांवर पांढरी पावडर पडल्यासारखी दिसते. पाने गळून फळधारणा होत नाही. दमट हवामानात हा रोग झपाट्याने फैलावतो .या रोगाचे नियंत्रण कारण्यासाठी बाविस्टिन १० ग्रॅम किंवा कॅराथेन १० मि.लि. १० लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने ३-४ फवारे द्यावेत.

टीप : उपरोक्त दिलेली माहिती कंपनीच्या संशोधन प्रक्षेत्रावरील आहे. जमीन व वातावरणानुसार उत्पादनात बदल होऊ शकतो.

R J Group
Aiming new heights

**आर जे बायोटेक प्रा.लि.**
सिध्दार्थ आर्केड, स्टेशन रोड, औरंगाबाद-४३१ ००५.
फोन :०२४०-२३५४९१२-१७ फॅक्स : ०२४०-२३३२१११
E-mail : rjseeds@rjgroup.org www.rjgroup.org